10 AUG 2023
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील क्रांतीवन ज्येष्ठांसाठी होणार खुले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रांतीवन परिसराच्या सुशोभीकरणाचे बुधवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे हे क्रांतीवन लवकरच ज्येष्ठ नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे. यावेळी क्रांती दिनानिमित्त शहीद क्रांतिकारकांना येथील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

स्मृतिफलक आहेत. या क्रांतीवन परिसराच्या सुशोभीकरणाच्या कामास २० मे रोजी प्रारंभ करण्यात आला होता. क्रांतीवनामध्ये ५०० मीटरचा प्रशस्त वॉकिंग ट्रॅक, पारसदृश बैठक व्यवस्था, योगासनांसाठी मंच उभारला आहे. सुशोभीकरणासाठी सौरदिवे, आसनव्यवस्था यासाठी बँक, उद्योगांकडून भरीव देणगी मिळाली आहे. शहिदांच्या नामफलकांचे आणि 'अनाम वीरा...' कवितेच्या फलकाचेही नूतनीकरण केले आहे. निर्धारित मुदतीत सुशोभीकरण केल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांनी उपकुलसचिव (स्थापत्य) रणजित यादव यांच्यासह अभियांत्रिकी, उद्यान विभागाच्या संपूर्ण चमूसह कंत्राटदारांचेही अभिनंदन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या क्रांतीवनाचे औपचारिक उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बुधवारी झाले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## काय आहे क्रांतीवन

कोल्हापूरच्या जनतेच्या वतीने ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांना राजर्षी छत्रपती शाहू पुरस्कार प्रदान करण्याचा कार्यक्रम नाशिक येथे झाला. त्यावेळी तत्कालीन कुलगुरू डॉ. द. ना. धनागरे उपस्थित होते. त्याप्रसंगी कुसुमाग्रजांनी, प्रत्येक विद्यापीठामध्ये त्या त्या परिक्षेत्रातील शहिदांची नावे असणारे एक स्मृतिस्थळ विकसित करण्याची सूचना केली होती. त्यांच्या सूचनेनुसार सन २००० मध्ये शिवाजी विद्यापीठात क्रांतीवनाची निर्मिती करण्यात आली.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील क्रांतिवनाला सुशोभीकरणानंतर नवे रूप मिळाले आहे. या क्रांतिवनामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविलेला सुमारे ५०० मीटरचा वॉकिंग ट्रॅक बनविला आहे.

# शिवाजी विद्यापीठातील क्रांतिवनाला मिळाले नवे रूप

कोल्हापूर, ता. ९ : सुशोभीकरणाने शिवाजी विद्यापीठातील क्रांतिवन परिसराला नवे रूप मिळाले आहे. या सुशोभीकरणाचे आज कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. क्रांतिदिनानिमित्त शहीद क्रांतिकारकांना क्रांतिवनातील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांनी आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी अभिवादन केले. लवकरच हे क्रांतिवन ज्येष्ठ नागरिकांसाठी खुले होणार आहे.

विद्यापीठाच्या क्रमांक आठ प्रवेशद्वारासमोरील सुमारे २ एकर परिसरात क्रांतिवन आहे. या ठिकाणी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर (सन २००३ पर्यंत) जिल्ह्यांतील शहीदांचे स्मृतिफलक आहेत. या परिसरात प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांना प्रवेश देण्यात येणार असून, येथे फिरावयास येणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठास प्रसन्न वाटावे आणि विद्यार्थ्यांच्याही मनात शहीदांप्रती कृतज्ञभाव निर्माण व्हावा, या दृष्टीने या परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

दरम्यान, क्रांतिदिनाच्या निमित्ताने कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा..' या कवितेचे सामूहिक वाचन करण्यात आले आणि राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली.

### सुशोभीकरणात नवे काय?

या सुशोभीकरण केलेल्या क्रांतिवनामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविलेला सुमारे ५०० मीटरचा वॉकिंग ट्रॅक बनविला आहे. उद्यानात पारसदृश बैठक व्यवस्था केली असून, योगासनांसाठी मंच उभारला आहे. शहिदांच्या नामफलकांचे आणि 'अनाम वीरा...' कवितेच्या फलकाचेही नूतनीकरण, संरक्षक भिंतीची दुरुस्ती व रंगकाम केले आहे. सोनचाफा, कांचन, जांभूळ आदी रोपे, फुलझाडे लावली आहेत.

पुढारी

# विद्यापीठातर्फे क्रांतिकारकांना अभिवादन

कोल्हापूर : क्रांतिदिनानिमित्त शहीद क्रांतिकारकांना क्रांती वनातील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी अभिवादन केले. विद्यापीठाच्या क्रांती वन परिसराच्या सुशोभीकरणाचे उद्घाटन कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांच्यासह अभियांत्रिकी, उद्यान, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभागाचे सहकारी उपस्थित होते.

10 AUG 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्याधिष्ठित शिक्षणाकडे 'विद्यापीठा'ची पावले

**❑ शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दहा नवे कोर्सेस, रोजगाराची शोधाशोध संपवण्याचा प्रयत्न**

> नव्या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठाने दहा नव्या कोर्सची रचना केली आहे. या वर्षीपासून या कोर्सला विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. पारंपरिक अभ्यासक्रमांपेक्षा काहीसे वेगळे आणि रोजगार, तसेच व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांत नावीन्यपूर्ण करिअर घडवण्यासाठी हे कोर्स विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरतील.
>
> **डॉ. व्ही. एन. शिंदे**, प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

■ अनुराधा कदम ■

। कोल्हापूर : पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा अभ्यास, संशोधन, त्यानंतर नोकरीसाठी शोधाशोध या पारंपरिक शैक्षणिक पद्धतीमुळे रोजगारनिर्मितीसाठी विद्यार्थ्यांना वाट पाहावी लागते. मात्र, आता शिवाजी विद्यापीठाने कौशल्यपूर्ण शिक्षण आणि नोकरी-व्यवसायाच्या संधी यातील अंतर कमी केले आहे. २०२३ ते २४ या शैक्षणिक वर्षापासून दहा नवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. काळानुरूप निर्माण झालेले करिअरचे मार्ग, नोकरीच्या असंख्य संधी आणि व्यावसायिक कवाडे या नव्या कोर्समुळे खुली होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठात सध्या ४०हून अधिक विद्याशाखांचे अधिविभाग कार्यरत आहेत. कला, वाणिज्य, शास्त्र या तीन प्रमुख शाखांमधील पदव्युत्तर पदवी संशोधन यासह मानव्यशास्त्र, सामाजिक शास्त्र, गणितशास्त्र, ग्रंथालय, संवादशास्त्र, वृत्तपत्र लेखन, संगीत वादन या विभागांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पदव्युत्तर पदवी घेणे आणि त्यातून आवडीच्या क्षेत्रात नोकरी किंवा व्यवसाय करणे ही विद्यापीठ स्तरावरील शैक्षणिक चौकट होती. मात्र, गेल्या काही वर्षांत तरुणाईच्या मनातील करिअरच्या संकल्पना विस्तारत आहेत. पारंपारिक विद्याशाखा आणि त्यातील करिअरचा उंबरठा ओलांडून विद्यार्थी नवे काहीतरी शोधत आहेत. महत्त्वाचे म्हणजे दहावी, बारावी, पदव्युत्तर पदवी, संशोधन या समीकरणापेक्षा विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्ठित शिक्षण, नोकरी-व्यवसायासाठी विपुल संधी खुणावत आहेत. याच बदललेल्या अपेक्षांना पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने दहा नव्या कोर्सेसची रचना केली आहे. दोन वर्षांच्या कालावधीचे हे कोर्स विद्यार्थ्यांच्या कौशल्याला वाव देणारे असून, भविष्यातील करिअरच्या संधी अधिकाधिक संख्येने उपलब्ध करून देणारे आहेत.

मराठी अधिविभागाच्या वतीने संस्कृत व पाली भाषा विषयांचे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत, तर फिल्म मेकिंगमध्ये पदवी देणारा अभ्यासक्रमही लवकरच सुरू होत आहे. गणित विभागाच्या वतीने 'मॅथेमॅटिक्स विथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन' या कोर्सची रचना केली आहे. भूगोल अधिविभागाच्या वतीने टुरिझम क्षेत्रातील भविष्यात निर्माण होणाऱ्या संधी ओळखून टुरिझम मॅनेजमेंटचे शिक्षण देणारा कोर्स सुरू करण्यात येत आहे. क्रीडा क्षेत्रातील बी. ए. स्पोर्ट्स, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या वतीने योगशास्त्रातील पदवी, तर रुरल मॅनेजमेंट, ॲडव्हान्स एक्सेल, क्रिप्टोग्राफी अँड नेटवर्क, डिझास्टर मॅनेजमेंट, फौंड्री टेक्निशियन, अर्धमागधी प्राकृत, ग्लास ब्लोईंग हे विशेष कोर्स सुरू केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वस्तुनिष्ठ ऐतिहासिक कार्यावर व त्यातून प्रतीत होणाऱ्या विचारांवर आधारित मॅसिव्ह ओपन ऑनलाईन कोर्स आणला आहे.

10 AUG 2023
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. बापुजी साळुंखेंनी शिक्षणातून केली समाजनिर्मिती

▪ डॉ. रणधीर शिंदे यांचे प्रतिपादन : विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. बापुजी साळुंखे यांचा स्मृतिदिन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे योगदान मोलाचे आहे. शिक्षण संकुलातून बापूजींचे द्रष्टेपण दिसते. शिवाजी विद्यापीठाच्या निर्मितीमध्ये बापूजींची महत्वाची भूमिका होती. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३६ व्या स्मृतिदिन निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि आजचे शिक्षण' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजनांना शिक्षणप्रवाहात आणले. शिक्षणातील संधी आणि आव्हाने ओळखून बापूजींनी ६९ वर्षे शिक्षण क्षेत्रात काम केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना शिक्षकांनी सजग असणे गरजेचे आहे. दहावी–बारावी परीक्षेतील गुणवंत व जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. यावेळी चित्र–शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन केले.



कोल्हापूर : मार्गदर्शन करताना डॉ. रणधीर शिंदे. सोबत संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, डॉ. आर. आर. कुंभार, आदी.

संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करुन दिली. (अर्थ) सिताराम गवळी यांनी आभार मानले. डॉ. कविता तिवडे व प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष लालासाहेब यादव, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2023

सकाळ

# ‘सीपीआर’च्या मदतीला धावले शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर: गेल्या काही दिवसांपासून सीपीआर रुग्णालयामध्ये अपुरा रक्तपुरवठा असून प्रशासनाने रक्तदानाचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ऊर्जा मैत्री परिवाराने ऑगस्ट क्रांतिदिनी रक्तदान शिबिर घेतले. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहातील या शिबिरात २२१ रक्तदाते सहभागी झाले. त्यात प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, कर्मचाऱ्यांचा समावेश होता. विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग राहिला.

पुण्यनगरी

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन : १९ ला प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश दिला जाणार आहे. त्यासाठीची प्रवेश परीक्षा दि. १९ ऑगस्ट रोजी होणार आहे. या प्रवेश परीक्षेचे अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आणि केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी दि. १४ ऑगस्टपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासहित केंद्राच्या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश कांबळे यांनी केले आहे.

लोकमत

# स्पर्धा मार्गदर्शनची १९ ला प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळण्यासाठी येत्या १९ ऑगस्टला प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी ऑफलाइन पद्धतीने अर्ज मागविले आहेत. याची सूचना शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) यूजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पिटिटिव्ह एक्झामिनेशन्सवर उपलब्ध आहेत.

10 AUG 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पेपर फुटीप्रकरणी शहाजी कॉलेजचे चार कर्मचारी बडतर्फ

## शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीने कॉलेजला पाठविला होता अहवाल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षेदरम्यान बी.कॉम.च्या ॲडव्हान्स अकौंटन्सी पेपर फुटीप्रकरणी शहाजी कॉलेजच्या चार कर्मचाऱ्यांना विद्यापीठ परीक्षा प्रमाद समितीने दोषी ठरविले आहे तसा अहवाल समितीने कॉलेजला पाठविल्यानंतर कॉलेज प्रशासनाने चार कर्मचाऱ्यांना बडतर्फ केले.

३१ मे २०२३ रोजी परीक्षा सुरू होण्याअगोदर पेपर फोडण्याचा धक्कादायक प्रकार घडला होता. शिवाजी विद्यापीठाने या साऱ्या प्रकरणाची गंभीर दखल घेत परीक्षा प्रमाद समितीमार्फत चौकशी केली होती. या पेपर फुटीप्रकरणी कोल्हापुरातील शहाजी कॉलेजमधील चार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची सूचना दोन दिवसांपूर्वी परीक्षा प्रमाद समितीने केली होती. विद्यापीठाच्या सूचनेनुसार कॉलेज प्रशासनाने चार कर्मचाऱ्यांना मंगळवारी सेवेतून बडतर्फ केले आहे. गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळ या साऱ्या प्रकरणाची चौकशी सुरू होती. शिवाजी विद्यापीठाने यासंबंधी कॉलेज प्रशासनाकडून अहवाल मागविला होता तसेच सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले होते. या सगळ्या प्रकाराची चौकशी करून समितीने या समितीने कॉलेजमधील एक वरिष्ठ लिपिक, दोन ज्युनिअर लिपिक व एका रजिस्ट्रारला दोषी ठरवले तसा अहवाल कॉलेजला पाठवला. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. रवी भोसले, क्लार्क सिद्धेश मिस्त्री, गणेश पाटील व विशाल पाडळकर यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, पेपर फुटी प्रकरणाचा अहवाल दोन दिवसांपूर्वी कॉलेजला दिला आहे. त्यात दोषींवर वेगवेगळ्या प्रकारची कारवाई निश्चित करण्याबाबतच्या सूचना दिल्या असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

### नेमके काय होते प्रकरण

- शिवाजी विद्यापीठातर्फे बी.कॉम.ची सहाव्या सेमिस्टर अंतर्गत परीक्षा मे २०२३ मध्ये घेण्यात आली. ३१ मे रोजी ॲडव्हान्स अकौंटन्सी पेपर होता. दुपारच्या सत्रात परीक्षा होती. परीक्षा सुरु होण्याअगोदरच हा पेपर फुटला. हा प्रकार काही वेळांतच लक्षात आला. विद्यापीठ प्रशासनाने तत्काळ हालचाली करुन संबंधित प्रश्नपत्रिकेऐवजी दुसऱ्या प्रश्नपत्रिकेच्या आधारे परीक्षा घेतली. नियोजित वेळेत परीक्षा सुरु करण्यास विलंब झाल्याने विद्यार्थ्यांना जादा वेळ दिला.

लोकसत्ता

# कॉपी प्रकरणी ६४८ विद्यार्थ्यांवर कारवाई

**कोल्हापूर :** कॉपीबहाद्दर विद्यार्थ्यांवर शिवाजी विद्यापीठाने कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. गेल्या तीन महिन्यांत पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्या ६४८ विद्यार्थ्यांना कारवाईला सामोरे जावे लागले आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश आहे. कॉपी रोखण्यासाठी विद्यापीठाने भरारी, बैठ्या पथकांच्या माध्यमातून कारवाईचे पाऊल उचलले आहे. परिणामी उन्हाळी सत्रातील परीक्षांचा निकाल सरासरी ३० टक्क्यांनी घटला होता. हिवाळी सत्रातील परीक्षांसाठी प्रायोगिक तत्त्वावर १८ परीक्षा केंद्रांवर बैठे पथक तैनात केले होते. शिवाय प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रत्येकी तीन भरारी पथके २५ मेपासून कार्यान्वित ठेवली होती.

10 AUG 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## पेपर फुटीप्रकरणी शहाजी कॉलेजच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई

# अधीक्षकासह चौघे बडतर्फ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षेदरम्यान बी.कॉम.च्या अ‍ॅडव्हान्स अकाऊंटन्सी पेपर फुटीप्रकरणी शहाजी कॉलेजमधील अधीक्षकासह चार कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले. शिवाजी

**शिवाजी विद्यापीठ इतिहासातील पहिलीच घटना**

विद्यापीठ प्रमाद समिती अहवाल व महाविद्यालयाने स्वतंत्रपणे केलेल्या चौकशीत चार कर्मचारी दोषी आढळून आले. त्यानुसार संस्थेने चार कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ केले. पेपरफुटी प्रकरणात चार कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई होण्याची पहिलीच घटना आहे. पान ४ वर

## अधीक्षकासह चौघे बडतर्फ

(पान १ वरून) विद्यापीठातर्फे बी.कॉम.ची सहाव्या सेमिस्टरअंतर्गत परीक्षा मे २०२३ मध्ये सुरू होती. दि. ३१ मे रोजी अ‍ॅडव्हान्स अकाऊंटन्सीचा पेपर दुपारच्या सत्रात होता; पण परीक्षा सुरू होण्याअगोदरच हा पेपर फुटला. पेपर फुटल्याचा प्रकार निदर्शनास आल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने दुसऱ्या प्रश्नपत्रिका पुरवल्या. या प्रकरणाची गंभीर दखल घेत परीक्षा प्रमाद समितीमार्फत चौकशी सुरू होती. शिवाजी विद्यापीठाने यासंबंधी कॉलेज प्रशासनाकडून अहवाल मागवला. तसेच सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले होते. सर्व उपलब्ध पुरावे तापसल्यानंतर शहाजी महाविद्यालयातील कर्मचारी दोषी आढळून आले. या प्रकरणात संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयास दिले. दरम्यान, परीक्षा प्रमाद समितीची चौकशी सुरू असताना महाविद्यालयानेही स्वतंत्र चौकशी समिती नेमली होती. यामध्ये संबंधित कर्मचारी दोषी आढळून आले. प्रमाद समितीचा अहवाल आणि चौकशी समिती अहवालानुसार, संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांनी चर्चा करून चार कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याच्या निर्णय घेतला. सेवेतून बडतर्फ केलेल्या चार कर्मचाऱ्यांमध्ये अधीक्षक रवी भोसले, क्लार्क सिद्धेश मिस्त्री, गणेश पाटील व विशाल पाडळकर यांचा समावेश आहे. व्यवस्थापनाने निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी केली.